श्री राम चंद्र मिशन
केवळ खाजगी वितरणाकरिता
ECHOES INDIA
जानेवारी २०१३ खंड ६ अंक १

# नूतन वर्षाभिनंदन !

## अत्यंत तणावाचे वर्ष

नुकत्याच संपलेल्या वर्षामध्ये (२०१२) पूज्य गुरुदेवांना जिवावरच्या अशा गंभीर आजारपणाचा सामना करावा लागला. जुलैमध्ये पू. गुरुदेवांच्या गंभीर आजारामुळे त्यांना तिरुप्पुर येथे साजऱ्या झालेल्या आपल्या जन्मदिवसाच्या सोहोळ्यापासूनदेखिल दूर रहावे लागले. दि. १५ ऑगस्ट रोजी मिशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याकरीता मणपाक्कम येथे गुरुदेवांनी एका विषेश भंडाऱ्याचे आयोजन केले होते. अतिशय थोड्या कालावधीत एकत्र जमलेल्या सुमारे २०,००० अभ्यासींच्या उपस्थितीत गुरुदेवांनी आपला विचार बदलला व बंधू कमलेश पटेल यांची प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी पार पाडण्यासाठी उपाध्यक्ष म्हणून नियुक्ति केली. तेव्हापासून गुरुदेवांची शक्ती हळूहळू परत येत असल्याचे जाणवत आहे.

गेल्या तीन महिन्यात आपली प्रकृती पूर्वपदावर आणण्याचा दिशेने गुरुदेवांनी ठोस पावले उचलली आहेत असे लक्षात येत आहे. प्राणवायूचे नळकांडे व चाकांच्या खुर्चीची गरज हळूहळू कमी होत आहे. आता चालण्याची काठी आणि एका मदतनीसाच्या हाताचा आधार घेऊन गुरुदेव स्वत: ध्यानकक्षामध्ये चालत येतात आणि गुरुदेवांच्या छायाचित्रांना पुष्पहार अर्पण करतात. ते आपल्या गाडीमध्ये प्रवास करतात व आश्रमामध्ये गोल्फ-कार्ट वापरत आहेत. ते तर आता भारतामध्ये प्रवास करण्याबद्दलही बोलू लागले आहेत ! या दरम्यान अभ्यासींचे अनेक गट मणपाक्कम आश्रमामधे गर्दी करत आहेत आणि गुरुदेव त्यांच्यासाठी सत्संगांचे संचालन करीत आहेत. आता प्रशासकीय कामासाठी व ईमेलद्वारे पत्रव्यवहारासाठी ते पुरेसा वेळ व शक्ती देत आहेत.

'गायत्री' या आपल्या निवासस्थानी रहावयास गेल्यानंतर गुरुदेवांच्या प्रकृतीमधे अधिकाधिक सुधारणा होत आहे. सत्संगांचे संचालन करण्यासाठी अचानकपणे आश्रमामध्ये जाऊन गुरुदेव अभ्यासींना सुखद आश्चर्याचा धक्का देतात. त्यांच्या जेवणामध्ये थोडी सुधारणा असून त्यांच्या चेहऱ्यावर वेदनेच्या खुणा आता दिसून येत नाहीत, परंतु त्यांना लवकर थकवा येत असल्याचे मात्र जाणवते.

काही दिवसांपूर्वी बंधू माधव यांच्या घरी एका अभ्यासीने गुरुदेवांना सांगितले, "गुरुदेव, या पुढे आपल्याला अधिक वेदना होऊ नयेत. आपण पुरेसे सहन केले आहे." यावर गुरुदेवांचा चेहरा उजळला व उजवा हात पुढे करून ते "तथास्तु" असे म्हणाले. या नव्या वर्षाबरोबरच गुरुदेवांच्या जीवनात वसंत ऋतुचे आगमन होवो आणि त्यांना उत्तम आरोग्य व सौख्य लाभो अशी आमची शुभकामना आणि प्रार्थना.



गुरुदेवांच्या नव्या वर्षाची सुरुवात 'गायत्री' येथे झाली. सकाळी लवकर उठून गुरुदेवांनी आपल्या कुटुंबियांचे व उपस्थित अभ्यासींचे अभीष्टचिंतन केले. आपली आन्हिके लवकर संपवून ते आश्रमात जाऊन अभ्यासींना भेटण्यास उत्सुक होते. पूर्वनियोजित वेळेआधी ते आश्रमात पोहोचले. सुमारे ७५०० अभ्यासी आश्रमात उपस्थित होते. आश्रमात प्रवेश करतेवेळी गुरुदेवांचे स्वागत अभ्यासी व लहान मुलांच्या मोठ्या रांगेने केले. यानंतर त्यांनी सुमारे एक तास चाललेल्या सत्संगाचे संचालन केले. यानंतर गुरुदेवांनी केलेल्या भाषणात 'पूर्व-परीक्षण म्हणजेच पूर्वग्रह' या विषयावर आपले विचार मांडले. आपण दुसऱ्यांचे परीक्षण करतो तेव्हाच पूर्वग्रह होतो असे नाही, तर आपण स्व-परीक्षणामुळेही पूर्वग्रह निर्माण करतो. "कारण जेव्हा मी माझे स्वत:चे परिक्षण करतो तेव्हा त्या परिक्षणाच्या अनुषंगाने मी स्वत:ची निर्भत्सना करित असतो." "आनंद हा मानवी जीवनाचा उद्देश्य नसून उत्क्रांती हे त्याचे ध्येय आहे" असे ते म्हणाले.

भाषणानंतर गुरुदेवांनी प्रेक्षागृहाकडे प्रस्थान केले. अत्यंत थकलेले असूनसुद्धा ते अनेक अभ्यासींना भेटत होते, अनेकांना उपहार देत होते व स्विकारतही होते, मिशनच्या कार्याची चर्चा करीत होते तसेच बालकांची नामकरणे इत्यादी कामे करीत होते. आश्रमामध्ये दुपारचे जेवण करुन दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ते 'गायत्री' येथे परतले. फ्रान्स व स्वित्झर्लंड येथून आलेल्या व रात्री परतीच्या प्रवासासाठी निघालेल्या अभ्यासींची गुरुदेवांनी संध्याकाळी भेट घेतली. यावेळी गुरुदेवांनी त्यांनी पूर्वी युरोपात केलेल्या प्रवासाबद्दल बोलणे सुरु केले.

संभाषणादरम्यान गुरुदेव म्हणाले, "पूज्य बाबूजी म्हणत असत की 'अज्ञान ते ज्ञान ते अज्ञान'. या दोन्ही अज्ञानामध्ये काय फरक आहे? पहिले अज्ञान म्हणजे आपल्याला काहीही माहित नसते. दुसरे अज्ञान म्हणजे आपल्याला सर्व काही माहित असूनसुद्धा काहीही माहित (समजलेले) नसते. ज्ञानाला सीमा नाही. ज्ञान कधीही संपुष्टात येत नाही."



## ऑक्टोबर २०१२

ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या काही आठवड्यांमध्ये गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत होती व त्यांच्या सकाळच्या नित्यक्रमात फिजीओथेरपी, विश्रांती व न्याहारीचा समावेश होता. सामान्यत: त्यांच्या न्याहरीच्या वेळी त्यांना वृत्तपत्रे वाचून दाखविली जात होती. त्यानंतर गुरुदेव त्यांच्या ई मेलच्या कामाची सुरुवात करीत असत.

शुक्रवार दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ च्या सत्संगानंतर गुरुदेव निवासकक्ष 'अ' मध्ये पुणे येथील अभ्यासींना भेटण्यासाठी आले. त्यांनी एक छोटे भाषण केले व त्यानंतर सर्वांना सिटींग दिली.

शनिवार दि. १३ ऑक्टोबर रोजी कुटीराच्या नूतनीकरणाचे काम सुरु झाले. कुटीराचे विविध भाग मोकळे करण्यात आले आहेत व नूतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

एकदा दुपारच्या जेवणानंतर गुरुदेवांनी एका तासाहून जास्त वेळ बातचीत केली. फ्रान्स येथून सुमारे १५ अभ्यासी त्यांना भेटावयास आले होते. त्यामधील एका व्यक्तीस गुरुदेव गतकाळापासून ओळखत होते व जेव्हा त्यांनी त्या भगिनीचे नाव उच्चारले तेव्हा ती हेलावून गेल्याचे स्पष्टपणे जाणवले. गुरुदेव म्हणाले, जेव्हा आपण प्रेम करतो तेव्हा आपणास आठवण रहाते. आठवणींचा भौतिक परिणाम इतका असतो की एखादा सुगंध, आपण पाहिलेले एखादे दृष्य किंवा ऐकलेली एखादी गोष्ट इत्यादी आपणास आठवते व ती आठवण त्या विशिष्ट प्रसंगाला वर्तमानात घेऊन येते.

रविवार दि. १४ ऑक्टोबरचा दिवस विशेष होता, कारण तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतर गुरुदेव रविवारचा सत्संग संचालित करण्यासाठी ध्यानकक्षात आले व त्यांनी तासभर सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर ते परत बंधू माधव यांच्या निवासस्थानी गेले, बाहेर बसले आणि बंधू संस्कृत कानन यांनी त्यांच्या रविवारच्या नेहमीच्या परिपाठानुसार भगवद्गीतेतील अध्यायातील श्लोकांचे स्पष्टीकरणासहीत वाचन केले.

गुरुदेव फक्त एका व्यक्तीच्या मदतीने काठी घेऊन चालत आले त्यामुळे शनिवार दि. २० ऑक्टोबर हा दिवस गुरुदेवांच्या प्रकृतीतील सुधारणा दर्शविणारा मैलाचा दगड (खास दिवस) ठरला. इराण मधून आलेल्या भगिनींची त्यांनी भेट घेतली. बराच वेळ त्यांच्याशी तसेच तेथे जमलेल्या इतर अनेक जणांशी बातचीत केली. उपस्थितांवर सुरु असलेल्या सूक्ष्म व सखोल पातळीवरील त्यांच्या कामाची प्रचिती सर्वांना येत होती.

गुरुदेव म्हणाले की अध्यात्मिक कामाची सुरुवात नसते व शेवटही नसतो. काम नेहमीच सुरु आहे व भविष्यातही सुरु राहणार आहे आणि वर्तमानात तर मोठ्या प्रमाणावर काम करावयाचे आहे. आतापर्यंत काहीच काम झाले नाही असा विचार करणे अहंकारीपणाचे ठरेल. सध्याचे काम हे फक्त आपल्या पूर्वसुरींनी केलेल्या कामाचा वरचा हिस्सा आहे. आतापर्यंत फारसे काही काम झाले नाही असा अहंकारी विचार येऊ नये याबद्दल आपण काळजी घेतली पाहिजे. नम्रपणे व प्रेमपूर्वक काम करत राहिले पाहीजे.

एका संध्याकाळी गुरुदेवांची प्रकृती थोडी ठीक नव्हती म्हणून ते बाहेर आले नाहीत पण वादविवाद स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवलेल्या ओमेगा मधील मुलांची त्यांनी भेट घेतली. त्यांना भेटून ते उल्हासित झाले. गुरुदेवांनी त्यांच्याशी संवाद साधला आणि स्वत:चे अनुभवही त्यांना सांगितले.

बंधू ए. पी. दुराई गुरुदेवांना भेटण्यास आले व त्यांनी तामिळनाडू मधील विविध केंद्रांना नुकत्याच दिलेल्या भेटींबाबत संगितले. ते म्हणाले, आपण बघत आहोत ती सर्व प्रगती आपल्या लाडक्या गुरुदेवांनी केलेले अथक प्रयत्न व प्रवास यामुळेच आहे. या सर्व शहरांसाठी व केंद्रांसाठी त्यांनी अनेक वेळा प्रवास केला असेल. गुरुदेव म्हणाले, जेव्हा आपण ३०–४० वर्षांचे असतो तेव्हा तो काळ प्रवासासाठी व अशा प्रकारचे काम शक्य तितक्या कार्यक्षमतेने करण्यासाठी अतिशय योग्य असतो. आपले वय वाढल्यावर प्रवासामुळे येणारा थकवा हा अडथळा ठरतो.

एके दिवशी गुरुदेव आश्रमामध्ये कुटीराच्या नूतनीकरणाचे काम पाहण्यासाठी, ध्यानकक्षात चालू असलेल्या कामावर नजर टाकण्यासाठी व त्यानंतर निवासकक्ष 'अ' मध्ये संभाषणासाठी व सिटींग देण्यासाठी आले. उपाहारगृहामधे व सर्व ठिकाणी थांबून त्यांनी अभ्यासींसोबत काही काळ व्यतीत केला.







आश्रमाच्या या मोठ्या फेरीचा गुरुदेवांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाला. ते थकले आहेत हे स्पष्टपणे दिसून येत होते व नंतर दिवसभर त्यांना वेदना झाल्या. संध्याकाळी गुरुदेवांना बरे वाटत नव्हते आणि डॉक्टरांनी केलेल्या तपासण्यांमधून हे उघड झाले की तो केवळ ताण व थकवा होता.

ऑक्टोबरच्या शेवटी गुरुदेवांना थोडासा ताप होता. बऱ्याचशा संध्याकाळी ते सलाईन लावलेल्या अवस्थेत बिछान्यावरच होते व पाठीला आधार घेऊन बिछान्यातच बसत होते. ते जास्त बोलत नव्हते व आजारलेले दिसत होते. गुरुदेव म्हणाले, "मला काहीही खाण्याची इच्छा होत नाही पण हे लोक मला भरवतात आणि मी काहीतरी खाल्ले आहे याची खात्री करून घेतात."

बेंगलोर येथील चर्चासत्रा दरम्यान बंधू कमलेश यांनी गुरुदेवांना सांगितले की आश्रमातील संध्याकाळचा सत्संग हा अद्वितीय व अलौकिक होता. हे सर्व पूर्वतयारी केली असल्यामुळे झाले असणार असे याबाबत गुरुदेव म्हणाले. बेंगलोर येथील प्रशिक्षकाने याला अनुमोदन देताना सांगितले की मेळाव्यास येण्यापूर्वी सर्वांनी सिटींग घेतलेले होते. गुरुदेव म्हणाले, "होय, हे सर्व सफाईमुळेच आहे." जे गुरुदेवांना भेटण्यास मणपाक्कम आश्रमात येतात त्यांनी सिटींग घेऊन येणे अत्यावश्यक आहे जेणेकरून जिचा वर्षाव आपणावर करण्यास गुरुदेव सदैव तत्पर असतात अशी गुरुदेवांच्या प्रेमाची भेट आपल्याला मिळू शकेल.

## नोव्हेंबर २०१२

गुरुदेवांची प्रकृति जराशी खालावलेली होती आणि प्रतिजैविकांमुळे त्यांना अशक्तपणा आला होता. बहुतेक वेळा ते गुंगीतच असत. बाय–पॅप मशीन शिवाय ते श्वासोच्छवास करू शकत नव्हते. परंतु फुफ्फुसात जमा झालेला द्रव काढून टाकल्यानंतर लक्षणीय सुधारणा झाली. जंतूसंसर्गाची शक्यता तपासण्यासाठी सीटी स्कॅन देखील केले गेले.

दिवाळीच्या काही दिवस आधी बंधु भास्करन यांनी खास बनवून घेतलेली काही मिठाई आणली. ती कशाप्रकारे बनवणे आवश्यक आहे याबद्दल गुरुदेवांनी माहिती दिली उदा. ती बनवताना ओले हात वापरल्यास ती लवकर खराब होते, इत्यादि. ते करत असलेल्या कोणत्याही गोष्टीमध्ये परिपूर्णता आणण्यासाठी खोलात जाऊन लक्ष देणे खरोखरच अनुकरणीय आहे.

शुक्रवार दि. ९ नोव्हेंबर रोजी बंधू कमलेश यांनी आश्रमात अनेक विवाह संपन्न केले व अभ्यासी जोडपी गुरुदेवांना भेटावयास आली असता त्यांनी सर्वांना सिटींग दिले. संध्याकाळी फिजीओथेरपी नंतर ते चालत बाहेर आले व दिवाणखान्यात बसले. जेचा अभ्यासी त्यांच्याभोवती गोळा होत होते तेव्हा गुरुदेवांनी डोळे बंद करून घेतले व ते असे वाटत होते की जणूकाही त्यांनी सिटींग देण्यास सुरवात केली आहे. त्यांनी त्यांचे डोळे ३० मिनिटांनी उघडले, सर्वांना शुभरात्री म्हटले व ते आत गेले.

अलिकडे तो संध्याकाळचा नियमित परिपाठ झाला होता की गुरुदेव येत, दालनात बसत व जेव्हा अभ्यासी त्यांच्याभोवती जमा होत, गुरुदेव डोळे बंद करीत असत. कधीकधी त्यांनी, "कृपया ध्यान सुरू करा" असे म्हटलेले नसे पण शेवटी ते, "बस करा" म्हणत असत. एका संध्याकाळी गुरुदेव जेव्हा त्यांच्या कक्षात परत गेले तेव्हा दोन दिवसांपासून गुरुदेवांना भेटण्याचा प्रयत्न करत असणारी नागपूर केंद्रातील काही मुले आत आली व त्यांच्यापेकी एकजण म्हणाला, "गुरुदेव, लवकर बरे व्हा. आमचे तुमच्यावर प्रेम आहे." आणि यावर प्रतिसाद देत गुरुदेव म्हणाले,"होय मला माहीत आहे. त्यामुळेच मी जगत आहे." गुरुदेव असे म्हणतेवेळी त्यांच्या चेहऱ्यावरील तजेला सर्वांच्याच लक्षात आला.

रविवार दि. ११ नोव्हेंबर रोजी गुरुदेव यंत्रावर चालणारी चाकाची खुर्ची स्व:त चालवत आले, आरामात वळवून सहजपणे मंचावर गेले. गुरुदेवांनी ध्यानकक्षात प्रवेश करताच सर्व अभ्यासींनी टाळ्या वाजविण्यास सुरवात केली व त्यांच्या प्रियतमाचे आनंदाने व हृदयस्थ प्रेमाने स्वागत केले. गुरुदेवांनी एक तास पाच मिनिटे कालावधीचा सत्संग संचालित केला. दिवाळीच्या दिवशी प्रकृति ठीक नसताना देखील गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. केवळ त्यांच्या इच्छाशक्तीच्या बळावर ते बाहेर येऊन, आलेल्या अभ्यासींना भेटू शकले. गुरुदेवांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फार मोठ्या संख्येने आलेल्या अभ्यासींना भेटणे सुरूच ठेवले. ते पाच मिनिटात सुमारे पन्नासहून अधिक अभ्यासींना भेटले व म्हणाले, "मी थकलो आहे, मला आरामाची गरज आहे, आता भेट देणारे नकोत." दुपारी ते त्यांच्या शयनकक्षात पुन्हा काही अभ्यासींना भेटले.

दक्षिणपूर्व आशियामधील केंद्रांमधून आलेल्या सुमारे तीस प्रशिक्षकांसोबत गुरुदेवांची बैठक होती. त्यांनी त्यांना सिटींग दिले व 'प्रशिक्षकाचे काम' व सर्वसाधारण काम याबद्दल एक खूप परिणामकारक भाषण दिले.

प्रत्येकाने मिशनचे कार्य किती गंभीरतेने घेतले पाहिजे या विषयी गुरुदेव बोलले, "आपण जर खूप खोलवर बुडी मारली तर, अनेक गोष्टींचा उलगडा होतो व कामातून आपण काय शिकतो आणि आपल्याला कसा लाभ होतो यामुळे आपण आश्चर्याने थक्क होतो." एखाद्या सिटींगची सुरुवात व शेवट करण्यासंबंधी गुरुदेवांनी सांगितले की, "एखादी व्यक्ती कोणतेही कार्य फक्त सुरु करू शकते पण त्याचा शेवट करणे हे केवळ त्यांच्याच (बाबूजी महाराजांच्याच) हातात असते."

एका रात्री चित्रपट पाहिल्यानंतर भात व दही यांच्या सहाय्याने बनविलेले ’मोर–कली’ नावाचे एक खास दक्षिण भारतीय पक्वान्न गुरुदेवांच्या भोजनात होते. गुरुदेवांनी प्रत्येकाला त्याचे वाटप केले व ते म्हणाले की, “मी बरा झालो असल्याची ही एक खूण आहे." गुरुदेवांची प्रकृति जसजशी सुधारली तसे बंधू संस्कृत कन्नन यांची गीतेवरील रविवारची प्रवचने पुन्हा सुरु झाली. महिनाअखेर पर्यंत गुरुदेवांचे हिंडणे फिरणे हळूहळू वाढू लागले. ते नियमितपणे बाहेर येऊ लागले व उन्हात बसून अनेक अभ्यासींना भेटू लागले. ध्यानगृहातील व्यासपीठाच्या रचनेमध्ये सुचविलेल्या फेरफारांची संकल्पचित्रे गुरुदेव एका चर्चेच्या प्रसंगी पाहात होते. या बाबतीत प्रत्येकाचे मत जाणून घेण्याविषयी ते खूप काटेकोर होते., "आपण विचारमंथन करीत आहोत.” असे ते म्हणाले. सरते शेवटी सर्वांची मते ऐकून घेतल्यानंतर ते काम कसे करावे यासंबंधी त्यांनी मार्गदर्शक सूचना दिल्या.

गुरुदेवांची प्रकृति सुधारल्याचे दर्शविणारा आणखी एक प्रसंग म्हणजे एके दिवशी फिरण्याची काठी घेऊन ते चालत कुटीराच्या बाहेर आले तेव्हा त्यांचे व्यायामप्रशिक्षक (फिजिओथेरपिस्ट) म्हणाले, ’गुरुदेव, तुम्ही आज माझा दिवस धन्य केलात.’ व गुरुदेवांनी तत्काळ प्रतिसाद दिला, “हे सारे केवळ तुमच्याच प्रयत्नांमुळे शक्य झाले, धन्यवाद.”

## डिसेंबर २०१२

डिसेंबर महिन्यात गुरुदेवांच्या प्रकृतीत आणखी सुधारणा झाली. एका रविवारी ते गोल्फ कार्टमधून ध्यानगृहापर्यंत येऊन तेथील व्यासपीठावर चालत गेले. त्यांच्या प्रदीर्घ आजारानंतर प्रथमच ते अशाप्रकारे ध्यानगृहात आले. पहिल्या आठवड्यात पावसाची संतत धार लागली होती व गुरुदेवांना कार मधून जाण्याचा प्रयत्न करायचा होता. त्यावेळी रोजच्या संध्याकाळच्या व्यायाम(फिजिओथेरपी) सत्राचा एक भाग म्हणून गुरुदेव त्यांच्या कक्षापासून प्रवेशद्वारापर्यंत चालत आले व कार मध्ये बसले व बाहेर एक छोटीशी फेरी मारून आले. यावरून हे स्पष्ट दिसून आले की गुरुदेव शारिरीकदृष्ट्या उत्तम आहेत.

एके संध्याकाळी गुरुदेवांनी ’पिरॅमिडसचे प्रकटीकरण’ हा लघुचित्रपट पाहिला. अद्भूत असे पिरॅमिड व विविध ऐतिहासिक स्थापत्य रचनांविषयी खूप काही सांगणारा हा एक माहितीपर कार्यक्रम होता. त्यावर बरीच चर्चा झाली. वैश्विक कार्य कसे चालले आहे व परिवर्तन कसे महत्वाचे आहे, या संबंधी गुरुदेव बोलत होते. त्यावेळी एका व्यक्तीने प्रश्न केला की, ’जर एखादी नैसर्गिक आपत्ति अचानक येऊन आमच्यावर कोसळली तर त्यावेळेस आम्ही काय करावे?’ गुरुदेव उत्तरले, “त्यावेळी आपण ध्यान करत रहावे, हाच सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे त्या आपत्तीस तोंड देण्यास आपण सिद्ध होऊ.”

दोन प्रशिक्षणार्थी प्रशिक्षक आले व त्यांची गुरुदेवांशी ओळख करून देण्यात आली. गुरुदेव विनोदाने म्हणाले, “आता मी बरा झालो आहे व हे काम मी पुन्हा हाती घेतले पाहिजे.” गुरुदेव आजारी पडल्यापासून प्रशिक्षक बनविण्याचे काम बंधू कमलेश हेच करीत होते.

## 'गायत्री' कडे प्रयाण

जवळ जवळ साडे पाच महिन्यांनंतर गुरुदेव गायत्री येथे परतले. घरी परत आल्यावर सिटींग, प्रशासकीय कामकाज, अनौपचारिक चर्चा आदि गुरुदेवांची नित्य दिनचर्या पुन्हा सुरु झाली. दुपारच्या भोजनानंतर गुरुदेव सुमारे एक तास बोलत होते. त्यांच्या आजारपणाच्या नाजूक कालखंडात घडलेल्या अनेक गोष्टी त्यांना आठवत नव्हत्या आणि अभ्यासींनी जेव्हा काय घडले याची त्यांना आठवण करून दिली तेव्हा त्यांनी त्याबाबत आश्चर्य व्यक्त केले.

एका अनौपचारिक चर्चेदरम्यान गुरुदेव 'मत्सर' या विषयावर बोलत होते. गुरुदेवांनी सांगितले की, खूप लोक त्यांचा हेवा करीत व बाबूजी महाराजांसोबत असलेल्या गुरुदेवांच्या जवळीकीविषयी लोकांना असूया वाटे.

त्यावेळी एका बंधूने विचारले, 'मत्सर हा योग्य असतो काय?' त्यावर गुरुदेव उद्गारले, “मी बाबूजी महाराजांना हाच प्रश्न केला, तेव्हा त्यांचे उत्तर होते, 'नाही, मत्सर किंवा हेवा करणे हे वाईट आहे.' मत्सर हे ज्याची दुसऱ्या कशाबरोबर ही तुलना होऊ शकणार नाही, असे पाप आहे. मत्सरी व्यक्तीला कोणताही उपदेश देण्यासारखा नसतो. कारण मुळात मत्सराचा अर्थच असा आहे की, गुरुदेवांनी दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस जे काही पूर्वीच दिलेले आहे, ते तुम्हांस देण्याच्या गुरुदेवांच्या क्षमतेविषयीच तुम्ही शंका घेत आहात.”





## डॉ. इसाक अडिझेस यांची भेट

दि. १४ ते १६ डिसेंबर दरम्यान तीन दिवसांचा G.S.T. कार्यक्रम संचालित करण्यासाठी बंधू इसाक अडिझेस आले होते. एके दिवशी त्यांनी गुरुदेवांना विचारले की, 'मानव वंशाचे भवितव्य काय असेल?' त्यावर गुरुदेवांनी 'उत्तम' असे उत्तर दिले. तेव्हा बंधू इसाक यांनी अणुयुद्धाच्या धोका, विध्वंस इ. चा संदर्भ देऊन पुन्हा आपले मत आग्रहपूर्वक मांडले. त्यावर गुरुदेवांनी प्रतिसाद दिला की, "तो विध्वंस नसतो, तर ते प्रगतीच्या आड येणारे अडथळे हटविणे असते." नंतर ईश्वर व गुरुदेव यापैकी कोणावर विश्वास ठेवावा इकडे विषय वळला. गुरुदेव म्हणाले, "मी माझे गुरुदेव बाबूजी महाराज यांच्यावर विश्वास ठेवतो कारण सहज मार्ग विचारधारेप्रमाणे ईश्वरास मन नसते. ईश्वराने विश्व निर्माण केले व त्याच्या सृजना बरोबरच त्याची भूमिका समाप्त झाली." गुरुदेव पुढे म्हणाले, "भवितव्य ठरविणारे अस्तित्व हे स्वतः काही कार्य करू शकत नाही तर ज्यांच्या मार्फत काम करता येईल असे गुरुदेवांसारखे पृथ्वीतलावरील एखादे माध्यम त्याला कार्य करण्यासाठी गरजेचे असते." बंधू इसाक यांनी नंतर विचारले की 'प्रेमामध्ये भीती का असते?' गुरुदेव उत्तरले, "याचे एकमेव कारण म्हणजे आपण देऊ शकत नाही. द्या आणि देत रहा म्हणजे भय आपोआपच निघून जाईल." "द्या, म्हणजे आणखी देण्यासाठी तुम्हाला अधिकाधिक मिळत जाईल. मी त्याची हमी देतो," असे गुरुदेवांनी पुढे सांगितले.

रविवार दि. १६ डिसेंबर रोजी त्यांच्या निवासस्थानी वाट पाहात थांबलेल्या झारखण्ड मधील अभ्यासींना गुरुदेव भेटले. त्यानंतर आश्रमात येऊन त्यांनी सत्संग संचालित केला. मिशनच्या पदाधिकाऱ्यांसाठी चाललेल्या बंधू डॉ. इसाक यांच्या कार्यक्रमास ते उपस्थित राहिले. प्रशिक्षकांच्या कार्याविषयी ते म्हणाले की प्रशिक्षकांकडे सोपविलेल्या अभ्यासींच्या समुदायाच्या आध्यात्मिक वाटचालीचे पर्यवेक्षण करण्याचा विशेषाधिकार प्रशिक्षकांना प्राप्त झालेला असतो. "त्यामुळे अभ्यासींची सुटका करण्यासाठी जरूर पडल्यास नरकात जाण्याची तयारी देखील प्रशिक्षकांनी ठेवली पाहिजे," असे निरीक्षण गुरुदेवांनी नोंदविले.

रविवार दि. २३ डिसेंबर रोजी गुरुदेवांनी गायत्री येथे आठ जोडप्यांचे विवाह संपन्न केले. खिसमसच्या दिवशी आश्रमात सत्संगाचे संचालन करुन त्यांनी अभ्यासींना आश्चर्यचकित केले. सत्संगानंतर त्यांच्या कुटीराच्या नूतनीकरणाच्या कामकाजाची पाहणी करण्यासारखी त्यांची दैनंदिन कामे संपवून ते प्रेक्षागृह संकुलात गेले. त्यांनी ख्रिश्चन पार्श्वभूमी असलेल्या कित्येक परदेशी व भारतीय अभ्यासींना बोलावून घेऊन त्यांना भेटवस्तू दिल्या.

शनिवार दि.२९ डिसेंबर रोजी सतत पाऊस पडत होता. तरी पण खराब हवामानाची पर्वा न करता गुरुदेव आश्रमात आले व त्यांनी एक तासाचा सत्संग संचालित केला आणि लगेच ते गायत्री येथे परत गेले. त्या संध्याकाळी गायत्री येथे सिटींग झाल्यावर त्यांनी अभ्यासींनी आणलेल्या भेटवस्तू स्वीकारल्या. भगिनी आल्ला व बंधू इगोर यांनी कॅलिफोर्निया येथील जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या झाडाचा एक मोठा फोटो आणला होता. त्या झाडाबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, कॅलिफोर्निया मधील सदाहरित सूचिपर्णी जातीचा 'सिक्वोईया' प्रकारचा तो एक महावृक्ष आहे. हा वृक्ष जसजसा जुना होत आहे तसतसा तो अधिकाधिक शक्तीशाली होत चालला आहे. वाढत्या वयाबरोबर गुरुदेव सुद्धा असेच बळकट व्हावेत अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी गुरुदेवांना हिवाळ्यात घालण्याचे उबदार कपडे भेट दिले व गुरुदेवांची प्रकृती आता सुधारत असल्यामुळे त्यांना रशिया किंवा सत्खोलचा प्रवास करताना त्याची गरज भासेल असे ते म्हणाले. त्यावर गुरुदेवांनी हसून त्यांच्या या भेटीचा सौजन्याने स्वीकार केला.

दि.३१ डिसेंबरला रात्री गुरुदेव झोपायला जाण्यापूर्वी एक अभ्यासी गुरुदेवांना म्हणाला, "आम्हांस या वर्षीची सर्वात महान भेट मिळाली आहे व ती म्हणजे तुम्ही सहन केलेल्या गंभीर आजारपणातून बरे होऊन तुमचे सुखरूप परतणे." त्यावर गुरुदेवांनी उत्तर दिले की, "तुम्ही सारेजण इथे माझ्या अवती भवती आहात, हीच मला मिळालेली सर्वात मोठी भेट आहे." तो एक अत्यंत हृदयस्पर्शी असा क्षण होता आणि त्यावर तेथे नीरव अशी शांतता पसरली. त्या नंतर गुरुदेवांनी प्रत्येकाला नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या व ते झोपण्यासाठी निघून गेले.





# मणपाक्कम येथील चर्चासत्रे

## दि. १६ ते २१ ऑक्टोबर २०१२

गोरखपूर येथील सुमारे २५० अभ्यासी आणि पंजाब, हरियाणा व चंदिगढ या केंद्रातून सुमारे ४०० अभ्यासी या चर्चासत्रासाठी उपस्थित राहिले.

## दि. २३ ते २८ ऑक्टोबर २०१२

नोएडा येथील सुमारे २०० अभ्यासी व फैजाबाद, फरिदाबाद, अलिगढ, रामपूर आणि चिकली येथील अनेक अभ्यासी या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते. विविध सत्संग, गटचर्चा, सभा, सिटींग्ज यामध्ये जवळजवळ ५०० अभ्यासींनी भाग घेतला.

## दि. ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०१२

बेंगलोर येथून १३०० च्या आसपास अभ्यासी चर्चासत्रासाठी आले होते. पहिल्या दिवशी बंधू कमलेश यांनी उपस्थितांना संबोधित केले. इतर दिवशी भाषणे व त्यानंतर संध्याकाळी डी.व्हि.डी. दाखविण्यात आल्या. प्रशिक्षकांसाठी विषेश सत्रे आयोजित करण्यात आली होती.

## दि. ६ ते ११ नोव्हेंबर २०१२

विरुधुनगर, अलुवा आणि इतर अनेक उपकेन्द्रांमधील अभ्यासी, नागपूर आणि बरेलीच्या अभ्यासींसहित चर्चासत्रासाठी आले होते. नागपूर केंद्रातील छोट्या मुलांच्या एका गटाने आश्रमात चैतन्य निर्माण केले. या आठवड्यात एकूण जवळजवळ ५०० अभ्यासी आले होते.

## दि. १२ ते १८ नोव्हेंबर २०१२

दीपावलीच्या आठवड्यात गुजरात येथील जवळजवळ २०० अभ्यासी चर्चासत्रामध्ये उपस्थित होते. गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्यामुळे ते मंगळवारी आणि बुधवारी आश्रमात आले, त्यांनी सत्संगही संचालित केला. ते अनेक अभ्यासी व बालकांना भेटले आणि त्यांच्या उपस्थितीची अनुभूती सर्व अभ्यासींना जाणवली.

## दि. २० ते २५ नोव्हेंबर २०१२

आन्ध्रप्रदेशातील करिमनगर जिल्ह्यातील अभ्यासी तसेच गोदवरीखाणीसहित तिरुपती(पेड्डापळ्ळी, जम्मीकुन्टा, मनचेरियल, जयपुरम, श्रीरामपूर, मन्दामर्री, वेलमपळ्ळी, गुलेटी, असिफाबाद, सिरपूर ,बेल्लरी, कम्पलीकोट्टम आणि गंगावती इ.) येथील सुमारे ७०० अभ्यासी चर्चासत्रामध्ये उपस्थित राहिले.

## दि. २७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०१२

यामध्ये सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, फिलिपाइन्स, थायलंड, जपान येथील १५० अभ्यासी उपस्थित होते. हे चर्चासत्र योग्यरित्या संपन्न व्हावे यासाठी गुरुदेवांनी विशेश लक्ष दिले आणि त्यामुळे कार्यक्रम परिणामकारकपणे नियोजित केला गेला. गुरुदेवांनी सर्व प्रशिक्षकांना बंधू माधव यांच्या घरी आमंत्रित केले आणि एक प्रदीर्घ भाषण दिले. त्यानंतर सिटींगही दिली. भव्य असा अंतिम सामना असल्याप्रमाणे गुरुदेव त्यांच्या गोल्फगाडीमधून रविवारी आश्रमात आले आणि त्यांनी सकाळचा सत्संग संचालित केला.

## दि. ४ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०१२

दुसरा एक मोठा जवळजवळ ७५० अभ्यासींचा गट मुख्यत्वेकरुन आग्रा आणि रायबरेली, चंद्रपूर, फतेहपूर आणि इटाह या जवळपासच्या केंद्रांमधून आला होता. गुरुदेवांचा मुक्काम 'गायत्री' येथे होता आणि ते तेथे विश्रांती घेऊन लवकर बरे होण्यासाठीच गेले आहेत यावर ते जास्त भर देत होते. नेहमीप्रमाणेच चर्चासत्रामध्ये सर्व सत्संग झाले आणि बंधू कमलेश यांनी सत्संग आणि सभा यांमध्ये एक सक्रिय भूमिका पार पाडली.

## दि. ११ डिसेंबर ते १६ डिसेंबर २०१२

बिहार आणि झारखंड येथील जवळजवळ ७५० अभ्यासी प्रयत्नपूर्वक मणपाक्कम येथे चर्चासत्राकरीता उपस्थित राहिले. 'गायत्री' येथे शक्य तितक्या अभ्यासींना भेटण्याचा गुरुदेवांनी प्रयत्न केला. त्यांनी रविवारी आश्रमात येऊन प्रत्येकाला आश्चर्याचा सुखद धक्का दिला आणि त्यांनी सकाळचा सत्संग संचालित केला.

## मंगळवार दि. १८ ते २३ डिसेंबर २०१२

अमलापुरम, गुंटूर, कडपा (आंध्र प्रदेश) येथील एकूण जवळजवळ ६०० आणि रायचूर येथील २५ अभ्यासी चर्चासत्राला उपस्थित राहिले. येथे नियोजित सत्संगाशिवाय शुचिता, संस्कार, गुरुदेवांची भूमिका आणि धर्म व अध्यात्म्य या विषयांवरील भाषणे झाली तसेच प्रशिक्षकांची सभाही झाली.

## दि. २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१२

तमिळ भाषेतील 'साधनेचा पक्का पाया' या विषयावर दोन दिवस चाललेल्या सत्रामध्ये ४० श्रीलंकन अभ्यासींनी घेतलेला सहभाग ही या आठवड्यातील लक्षणीय गोष्ट होती. खिसमसच्या आणि त्याचबरोबर शनिवारच्या दिवशी, दूरवरुन आलेल्या अभ्यासींना भेटण्यासाठी गुरुदेवांची आश्रमातील उपस्थिती हा केंन्द्रबिंदू होता. जम्मू काश्मीर येथील ५० अभ्यासी, ज्यापैकी बरेचजण येथे प्रथमच येत होते, त्या सर्वांनी गुरुदेवांची भेट घेतली. याशिवाय उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश येथील अनेक केंद्रांमधून आलेले अभ्यासी मिळून एकूण संख्या ९५० वर गेली होती.

# युवा जागृती



## सहजमार्गात युवकांची भूमिका, पनवेल आश्रम, मुंबई

दि. ६ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील पनवेल आश्रम येथे बंधू मोहनदास हेगडे यांनी सुमारे ४० अभ्यासींसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मास्टर, मिशन आणि मेथड यांना समजून घेणे, मिशनच्या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होण्याकरीता युवकांना उद्युक्त करणे आणि एकात्मतेची भावना वाढीस लावणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

'साधनेची मूळ कल्पना' या विषयावरील चर्चासत्रामध्ये विशेषत्वाने साधनेप्रतिचा दृष्टीकोन आणि 'आध्यात्मिक अनुषंगाने भौतिक जीवन कसे जगावे?' या दोन गोष्टींवर जोर देण्यात आला होता. 'साधनेची मूळ संकल्पना' या विषयामुळे वर्तमानकाळात जगण्याचा दृष्टिकोन उजेडात आला. 'स्वयंसेवकांचे गुण' या विषयांतर्गत समर्पण, सबुरी, सहनशीलता आणि आज्ञाधारकपणा या गुणांचा स्वयंसेवी कामाप्रति कसा फायदा होतो याचा शोध घेतला गेला. 'आपले आदर्श–आपले गुरुदेव' या संकल्पनेअंतर्गत सहभागी बंधू–भगिनींना गुरुदेवांचे आपल्या जीवनातील काय स्थान आहे यावर चिंतन करणे भाग पडले. 'चारित्र्य–आध्यात्मिक हिताचे मूळ' या संकल्पनेअंतर्गत 'आध्यात्माचा पाया असणाऱ्या नैतिक मूल्यांचे महत्त्व' या विषयाशी निगडीत विचारमंथन झाले. 'सहज मार्गाच्या दहा सूत्रांचे महत्त्व' या प्रात्यक्षिक सत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमामुळे सहभागी अभ्यासींना तीन 'एम' ची उत्तम समज निर्माण झाली.

## सहज मार्ग युवा मंडळ, तिरुप्पुर

तिरुप्पुर केंद्रामध्ये येथील युवक नियमितपणे ध्यानगृहामध्ये एकत्र जमतात आणि स्वयंसेवी कार्याबद्दलच्या आपापल्या नवनवीन कल्पनांची देवाणघेवाण करतात. गुरुदेवांच्या परवानगीने दि.२९ ऑक्टाबर रोजी युवा मंडळाची स्थापना करण्यात आली. यात क्रीडा उपक्रमांचाही समावेश आहे. उद्घाटनपर सत्राची सुरुवात कोंगेयमयेथे दि. ४ नोव्हेंबर रोजी झाली. बंधू एन प्रकाश यांनी उद्घाटनपर भाषण दिले. बंधू एस. एस. रामकृष्णन, रवी आणि भगिनी एझिलार्सी यांनी युवकांना गुरुदेवांच्या स्मरणात मिशनची सेवा करण्यास उद्युक्त केले.




दि. ११ ते १३ नोव्हेंबर दरम्यान मंडळाचे २५ सदस्य आध्यात्मिक बैठक व स्वयंसेवी कार्यासाठी नतरामपल्ली येथील आश्रमात गेले होते. स्वच्छतेच्या कामाव्यतिरिक्त त्यांनी पुस्तकांचे वाचन केले, गटचर्चा केली, प्रश्नोत्तराच्या सत्रामध्ये भाग घेतला, गुरुदेवांच्या डीव्हीडी पाहिल्या. तसेच सत्संगाव्यतिरिक्त बऱ्याच मुद्द्यांवर चर्चा झाली. कार्यक्रम अत्यंत आनंदात व उत्साहात पार पडला.

## 'सहनशीलता' या विषयावर वडोदरा येथील युवकांसाठी कार्यशाळा

दि.१६ डिसेंबर रोजी भगिनी एलिझाबेथ डेनली यांनी ''साधनेचा पक्का पाया' या प्रशिक्षणातील 'सहनशीलता' या भागावर वडोदरा, आणंद व नडियाद येथील युवकांशी सुसंवाद साधला. भगिनी एलिझाबेथ आणि वडोदरा केंद्रातील पाच समन्वयक यांनी सबुरी आणि सहनशीलता या दोन विषयांवर दोन तासांचा कार्यक्रम घेतला. यात मुख्यत्वे ऐकणे आणि बोलणे या गोष्टींवर भर देण्यात आला होता. हृदयापासून ऐकणे व बोलणे या विषयांवरील गुरुदेवांच्या भाषणातील वेचे यावेळी वाचण्यात आले. सुमारे ६० अभ्यासींना गटांमध्ये विभागून त्यांना मदत करण्यासाठी व समजून सांगण्यासाठी प्रत्येक गटास एक समन्वयक देण्यात आला.

सहभागी अभ्यासींच्या नंतर जोड्या करण्यात आल्या आणि त्यांनी स्वत: ते जेव्हा असहिष्णु/ असोशिक झाले आणि त्यामुळे त्यांच्या नात्यांवर काय विपरीत परिणाम झाला याचे अनुभवकथन केले. 'मूक असहनशीलता' ही वेगळीच कल्पना एका अभ्यासीने या वेळी मांडली. न बोलता पण नकारात्मक हावभावावरून असहनशीलता दर्शविणे म्हणजेच 'मूक असहनशीलता' होय. समारोपाच्या वेळी प्रत्येक सहभागी व्यक्तीला चिंतन करण्यासाठी वाक्यांचा एक संच देण्यात आला. थोडक्यात सांगायचे तर सहभागी बंधू–भगिनींना हे सत्र खिळवून ठेवणारे आणि उपयुक्त वाटले.

# प्रशिक्षक बैठका

## एन सी आर दिल्ली विभाग



दिल्ली येथील दि. २४ नोव्हेंबरच्या बैठकीस ८० प्रशिक्षक उपस्थित होते. बंधू कमलेश पटेल यांनी मणपक्क्म येथून व्हीडीओद्वारे उद्घाटनपर भाषण केले. त्यामध्ये परिवर्तनाशी जुळवून घेणे, आंतरीक स्थिती अबाधित ठेवणे, संवेदनशीलता, विनम्रता, समर्पण तसेच सिटींग देण्यापूर्वी स्वत:ची अवस्था ओळखण्याची क्षमता अशा अध्यात्मिक जीवनातील पैलूंचा अंतर्भाव होता. डॉ. सत्य मंडल, (विभाग प्रमुख) हे 'बदल स्विकारण्याचे महत्व' याबाबत बोलले. पाच गट तयार करण्यात आले व प्रत्येकास चर्चेसाठी एक विषय देण्यात आला. गटप्रमुख संबंधित विषयाबाबतचा कृती आराखडा पुढील बैठकीत सादर करतील. दिल्ली केंद्राचे प्रमुख बंधू सुधीर मारवा, यांनी बुरारी येथील राष्ट्रीय आश्रमाबाबत सादरीकरण केले, व आश्रमासाठी जमीन ताब्यात घेतल्यानंतर केलेल्या प्रगतीचा तपशील सादर केला.



## जयपूर, राजस्थान

दि. २१ व २२ ऑक्टोबर रोजी जयपूर येथील विभागीय आश्रमात झालेल्या प्रशिक्षकांच्या बैठकीत चारित्र्याची जडण घडण, प्रशिक्षकांच्या कामकाजातील परिणामकारकतेच्या वाढीसाठी उपविभागीय गटांची स्थापना करणे, तरुणांना प्रशिक्षण तसेच नवीन प्रशिक्षकांच्या निवडीसाठी निवड प्रक्रिया तयार करणे या बाबी केंद्रस्थानी होत्या. सहभागींना भौगोलिक दृष्टया चार उपगटात विभागण्यात आले व सूत्रसंचालक नेमण्यात आले. त्यांनी चर्चेनंतर त्यांचा कृती आराखडा सादर केला. दुसऱ्या दिवशी संभाव्य प्रशिक्षकांना ओळखणे, तयार करणे व प्रशिक्षित करण्याची गरज स्पष्ट करण्यात आली. सत्रानंतर सर्व सहभागी समाधानी व उल्हसित झाल्याचे जाणवले.



## कर्नाटक

कर्नाटकमधील दक्षिण विभागातर्फे दि. ८ व ९ डिसेंबर रोजी प्रशिक्षक प्रवास सप्ताह आयोजित केला गेला. सत्तावीस प्रशिक्षकांनी चोवीस केंद्रांना भेट दिली. या सप्ताहात चोवीस गृह मेळावे ,सतरा केंद्रांमध्ये सपूर्ण दिवसीय कार्यक्रम, सहा केंद्रांमध्ये अर्ध दिवसीय कार्यक्रम आयोजित केले गेले. 'मिशनचे साहित्य वाचण्याचे महत्त्व' हा या कार्यक्रमाचा केंद्रविषय होता. कार्यक्रमाची सुरवात वैयक्तिक सिटींग व त्यानंतर संध्याकाळी 'साधनेचे मूलतत्व' या विषयाचा अंतर्भाव असलेल्या गृह मेळाव्याने झाली. रविवारच्या कार्यक्रमाची सुरवात सत्संगाने झाली व त्यानंतर झालेल्या गटचर्चेत बंधू कमलेश पटेल यांनी सुचविलेल्या ९ पुस्तकांचे वाचन करण्यावर भर देण्यात आला.

## प्रशिक्षकांची उत्तर कर्नाटक भेट

दि. ७ व ८ डिसेंबर रोजी, बेंगलोर मधील प्रशिक्षक बंधू एन. एस, नागराजा, बंधू बी. जी. प्रसन्ना कृष्णा व बंधू गिरीश तोतलूर यांनी प्रकाशन विभागातील स्वयंसेवकांसह उत्तर कर्नाटकातील विविध केंद्रांना भेटी दिल्या आणि व्याख्याने व सत्संगांचे संचलन केले. सेडाम, शोरापूर यादगीर, गोशी, हुम्नाबाद, भालकी व बिदर येथील केंद्रांच्या भेटीमधे विभाग प्रमुख बंधू राजू काशमपूरकर व स्थानिक प्रशिक्षक सुध्दा सहभागी झाले होते. बिदर येथे दि. ४ डिसेंबर रोजी एक पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रविवार दि. ९ डिसेंबर रोजी गुलबर्गा आश्रमात झालेल्या कार्यक्रमासाठी २७० अभ्यासी व उत्तर कर्नाटकातील सर्व प्रशिक्षक एकत्र जमले होते. तेथे 'हृदयापासून सेवा करा' या विषयावर भाषणे व गट चर्चा झाली. त्यानंतर प्रशिक्षक बैठक व प्रश्नोत्तरांचे सत्रही झाले. संध्याकाळी झालेल्या खुल्या सत्रात बंधू नागराजा, बंधू प्रसन्ना व बंधू राजा यांची व्याख्याने झाली. या प्रसंगी हजर असलेल्या तीस निमंत्रकांपैकी दहा व्यक्तींनी नंतर साधनेस सुरवात केली.



## सहसचिवांची आसामला भेट



दि.३१ ऑक्टोबर रोजी इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या आसाम विभागाकडून आलेले आमंत्रण स्विकारुन बंधू ए. पी. दुराई यांचे 'दक्षता जाणीव सप्ताह २०१२' मध्ये सहभागी होण्यासाठी दिग्बोई येथे आगमन झाले. बुधवार असल्यामुळे ते सुमारे ४० स्थानिक अभ्यासींसमवेत एक तासभर चाललेल्या चर्चासत्रात सहभागी झाले होते. या सत्रादरम्यान अभ्यासींना सहजमार्ग साधनेतील विविध पैलूंवर चर्चा करण्यास सांगितले गेले. याच कार्यक्रमाची पुनरावृत्ती पुढील रविवारी (दि.४ नोव्हेंबर रोजी) दोन तासांकरीता तिनसुखिया आश्रमात बंधू ए. पी. दुराई यांच्या परतीच्या प्रवासापूर्वी झाली. अभ्यासींनी कार्यक्रमाबाबत आभार व्यक्त केले आणि प्रशिक्षकांनी भविष्यात अशी चर्चासत्रे आयोजित करण्याबाबत आश्वासन दिले.

दि. १ नोव्हेंबर रोजी आय.ओ.सी. दिग्बोईचे 'प्रमुख दक्षता व्यवस्थापक' आणि प्रशिक्षक बंधू सुनंद पांडेय यांनी स्थानिक विद्यालयांसाठी परिचर्चा आयोजित केली होती. 'घरांमध्ये विद्यार्थ्यांना महत्त्वकांक्षा नव्हे तर मूल्ये रुजण्यासाठी उत्तेजन देण्याची आवश्यकता आहे' या विषयावरील चर्चेत सुमारे ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या उत्तम दर्जाच्या परिचर्चेची सांगता बंधू दुराईंनी 'महत्त्वकांक्षा आणि आकांक्षा' या विषयी गुरुदेवांनी दिलेल्या शिकवणुकीवर आधारित सादरीकरणाने झाली. पुढील दिवशी बंधू दुराई कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय उपस्थित असलेल्या 'दक्षता जाणीव सप्ताहाच्या' निरोपाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. पारितोषिक वितरणानंतर त्यांनी 'ध्यानाद्वारे आंतरीक सतर्कता राखण्याची आवश्यकता' या विषयावर भाषण दिले.

दि. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी काही पाहुण्यांसाठी ध्यानावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विभागप्रमुख बंधू धनीचंद यांच्यासह दिग्बोई तसेच जवळच्या तिनसुखिया, डुमडुमा, मार्गेरीटा आणि सिबसागर केंद्रांमधून सुमारे ६० अभ्यासी या कार्यक्रमासाठी उपस्थित





होते. काही अभ्यासींना सहज मार्गाविषयी विचार व्यक्त करण्याची विनंती करण्यात आली आणि बंधू दुराईंच्या सविस्तर सादरीकरणाने सत्राचा शेवट झाला. यावेळी सात मुमूक्षूंनी प्राथमिक सिटींगला सुरुवात केली.

संध्याकाळी दिग्बोई अधिकारी मंडळाने (क्लब) 'ध्यानाद्वारे स्वतःचा विकास' याविषयावरील भाषण आयोजित केले होते. मंडळातील ५० सदस्य, ज्यामध्ये अधिकारी आणि त्यांचे जोडीदार यांचा समावेश होता, कार्यक्रमात सहभागी झाले होते. समर्थ (कार्यक्षम) गुरुंच्या मार्गदर्शनाखाली 'ध्यानातून स्वत्वाची जाणीव' याविषयावर बंधू दुराईंनी सादर केलेले विस्तृत भाषण सर्वांना अतिशय भारावुन टाकणारे होते. हा आध्यात्मिक संदेश त्यांच्या हृदयाला स्पर्शून गेला असे वाटत होते.

## ए.एम.सी.(आश्रम देखभाल समिती) दिशा निदेशन कार्यक्रम: उत्तर आंध्र प्रदेश

दि.२१ ते २३ सप्टेंबरदरम्यान आंध्र प्रदेशातील उत्तर भागातील तुमकुंटा या विभागीय आश्रमात ११५ आश्रम देखभाल समिती सदस्य आणि अभ्यासींकरीता दिशानिर्देशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम आयोजित करण्यामागील उद्देश खालीलप्रमाणे होता–

- ए.एम.सी. सदस्यांना त्यांच्या आश्रम/ केंद्रासंबंधीत कामाची व्याप्ती (आवाका), त्या मध्ये त्यांची भूमिका आणि जबाबदारी याविषयी अवगत करावे.
- नियमित, सुसंयोजीत ए. एम. सी. बैठकींच्या निकडीला विशेष प्राधान्य दिले जावे तसेच बैठकीचे कार्यवृत्त लिहिले जावे.
- प्रत्येक वेळी ए. एम. सी. बैठक 'संप्रेषणातील (सुसंवादातील) मार्गदर्शक तत्वे' या प्रलेखांतर्गत संचालित केली जावी.

भूमिका आणि जबाबदारी, आश्रमाचा उपयोग, आर्थिक धोरण, स्वागतमंच, दुरुस्ती आणि देखभाल, मुलांचा कक्ष, स्वयंसेवक, आश्रमाची देखभाल करणारी व्यक्ती इत्यादि विषय अनुभवी वक्त्यांनी त्यांच्या भाषणात अंर्तभूत केले. नियमपुस्तिका तेलगू भाषेत अनुवादीत करण्यात यावी यावर सर्वांचे एकमत झाले. मुख्य कार्यालयाच्या आर्थिक धोरणावर बंधू श्रीराम यांच्यासह प्रश्नोत्तरांचे सत्र झाले.

कार्यक्रमामध्ये गुरुदेवांच्या संदेशाला अनुसरुन विचार, शब्द आणि कृती या आध्यात्मिक पैलूंवर भर दिला गेला होता. 'शुद्ध विचारांमुळे नेहमी चांगली वचने आणि कृती घडते' हे मार्गदर्शक तत्त्व ह्या कार्यक्रमासाठी अनुसरण्यात आले. आश्रमातील वातावरण जतन केले पाहिजे यावरही भर देण्यात आला.

## गोवा येथील एस.एम.एस.एफ़. आश्रमाचे उद्घाटन



दि.२६ डिसेंबर रोजी गुरुदेवांनी भारताच्या पश्चिम किनारपटटीवर वसलेल्या गोवा येथील आश्रमाचे व्हिडीओद्वारा उद्घाटन केले आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील गोवा मिशनच्या नकाशात समाविष्ट झाला. सॅनकोल गावामध्ये २.५ एकर परिसरात (डाबोलिन विमानतळा पासून ८ कि.मी. अंतरावर), ८० लोकांना पुरेसा होईल एवढा ध्यानकक्ष असलेले घर मुंबई केंद्राच्या बंधू बी. डी. कोसंबी यांनी भेट दिले. बंधू बी.डी. कोसंबी, त्यांचे ज्येष्ठ पुत्र विराज, बंधू पी. आर. कृष्णा, बंधू सुधीर मारवा, बंधू आदित्य आर्या आदी उद्घाटनप्रसंगी उपस्थित होते. गुरुदेव म्हणाले "बाबूजी मला सांगत असत की प्रत्येक घरच आश्रम असावे. आश्रमामधून आंतरीक स्थितीचे दर्शन घडावे."

सकाळी ९ वाजता बंधू पी. आर. कृष्णा यांनी सत्संगाचे संचालन केले तेव्हा ८५ अभ्यासी उपस्थित होते. आता आश्रम आणि परिसराचा विकास करण्यासाठी गोवा आश्रम विकास आणि समन्वय समिती पुरेशी प्रेरित झाली आहे.

## सुलभीकरण प्रात्यक्षिक, लखनौ


दि. ७ ते ९ डिसेंबर दरम्यान हिंदी भाषेमधून सुलभीकरण प्रात्यक्षिक कार्यक्रम आणि 'साधनेचा पक्का पाया'– जी.आय.टी. पी.चे आयोजन लखनौ आश्रम येथे करण्यात आले होते.चार विभागांमधुन (पूर्व उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश, पश्चिम उत्तर प्रदेश, उत्तराखंड) ६५ सहभागी आणि सात प्रशिक्षक – भगिनी छावी सिसोदिया, पूनम बब्बर, नंदिता माथुर, विमला शौरन आणि बंधू नीरज लवनिया, जिग्नेश शेलाट, ओमप्रकाश केजरीवाल आदींचा या उपक्रमात सहभाग होता.

दि.७ डिसेंबर रोजी सत्संगानंतर दोन लघुनाटिकांचे सादरीकरण प्रशिक्षकांनी केले. 'स्वत:ला स्वीकारणे' व 'बंधुभावाच्या दिशेने' या विषयांवर अनेक सत्रांचे आयोजन करण्यात आले. रात्रीच्या जेवणानंतर दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमामध्ये समन्वयकाचे काम करण्यासाठी निरनिराळ्या समूहांमधील काही सहभागींना नामनिर्देशीत करण्यात आले.


दि.८ डिसेंबर रोजी झालेला कार्यक्रम, सहभागींना आंतरीक चिंतन आणि निरीक्षणामधून साधना करण्याची जाणीव व्हावी व त्यांना ध्यानपद्धतीचे सुस्पष्ट आकलन व्हावे या करीता उपयुक्त होता. हा भाग संभाव्य अभ्यासींना साध्या आणि स्पष्ट पद्धतीने ध्यानाविषयी समजावून सांगण्याशी संबंधित होता.

दि.९ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचा भाग 'सफाई' या विषयावर आधारीत होता. सहभागींना सफाईचे महत्त्व समजावे, त्यामधील अडथळे ओळखून त्यात सुधारणा करण्याची पद्धत तसेच संभाव्य अभ्यासींना सफाईची पद्धत समजावून सांगणे हे या भागाचे उद्दिष्ट होते.


## नवीन प्रकाशने





पूज्य मालिक की वार्ताएं
हिंदी डिव्हीडी





स्लाइसेस ऑफ इटर्निटी
इंग्रजी पुस्तिका





टेल्स ऑफ वंडर खंड ३
इंग्रजी लहान मुलांसाठी





नाउ आय ॲम टेलींग यु
इंग्रजी डिव्हीडी





प्रशिक्षकांसाठी गुरुदेवांची भाषणे इंग्रजी
डिव्हीडी (२०१० ते २०१२) खंड ३




युथ–टाइम ऑफ प्रॉमिस ॲंड एफोर्ट
इंग्रजी एमपी३




बिकमींग व्हिजनरीज
इंग्रजी डिव्हीडी




हृदयीचे बोल २०१० खंड २
इंग्रजी डिव्हीडी

## प्रकाशन स्वयंसेवकांसाठी कार्यशाळा, गुलबर्गा, उत्तर कर्नाटक

बेंगलोर येथील बंधू वेंकट राव आणि चमूने दि. ७ व ८ डिसेंबर रोजी गुलबर्गा येथे आयोजित केलेल्या प्रकाशन कामातील स्वयंसेवकांच्या कार्यशाळेला उत्तर कर्नाटक, मुंबई व हैद्राबाद येथील जवळ जवळ ५० स्वयंसेवक उपस्थित होते. प्रकाशन कामासंबंधी स्वयंसेवकांची संख्या वाढावी, पुस्तके, फोटो, दृक-श्राव्य चित्रफीती, इ. माध्यमातून गुरुदेवांच्या संदेशांचा प्रसार करणे सुलभ व्हावे तसेच ग्रंथ वाचनाच्या सवयीचे महत्व अभ्यासींमध्ये ठसवावे, इ. ही या कार्यशाळेची उद्दिष्टे होती. प्रेरणादायी भाषणे, समूह चर्चा, विविध खेळ, विक्री कामाच्या रंगीत तालमी, विक्री कक्ष उभारणी आणि पुस्तके गोळा करणे व त्यांचे हिशेब ठेवणे आदि उपक्रमांचे प्रशिक्षण देण्यात आले. हा पूर्ण दोन दिवसांचा सखोल कार्यक्रम होता व त्यामुळे सहभागी स्वयंसेवकांना त्यापासून खूपच लाभ झाला आहे असे जाणवले.

## तेलगू भाषांतर प्रशिक्षण

गुरुदेवांच्या वाङमयाचा इंग्रजीतून प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करताना दोन्ही भाषांवर प्रभुत्व तर हवेच, पण सहजमार्ग शिकवणुकीची सखोल जाण असणे हे त्याहूनही अधिक गरजेचे आहे. आंध्र प्रदेशातील विविध भागांतील तसेच बेंगलोर व दिल्ली येथील सुमारे ५० अभ्यासींसाठी तुमकुंटा विभागीय आश्रमात दि. १४ ते १६ सप्टेंबर दरम्यान एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मूळ साहित्यकृतीशी सुसंगत, मिळते-जुळते व उत्तम प्रतीचे भाषांतर साधणे, हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. 'भाव, साधेपणा, ओघ व तीव्र तळमळ' हा प्रमुख विषय होता आणि त्याचा अर्थ होता, 'भाव अनुवादित करा; भाषा सहज सोपी ठेवा; विचारांचा ओघ कायम राखा व भाषांतराचे काम तीव्र तळमळीने हृदयापासून करा'.

बंधू अनंत, कामेश्वर व कृष्णा राव यांनी हा दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला होता. एक उत्कंठापूर्ण सत्र, सध्याच्या भाषांतर यंत्रणेवर एक सादरीकरण, भाषांतरकारांसाठी मार्गदर्शक तत्वे, लिप्यंतरांच्या संगणकीय प्रणालींवर एक कार्यानुभवी सत्र व भाषांतरावर एक प्रात्यक्षिक पाठ ही या कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये होती.

## साधनेचा पक्का पाया

नव्यानेच आरेखित करण्यात आलेला 'साधनेचा पक्का पाया' हा कार्यक्रम अहमदाबाद व जयपूर येथे तीन दिवसांसाठी संचालित करण्यात आला तर उडुपी केंद्रात पूर्ण दिवसीय कार्यक्रम म्हणून तो आयोजित करण्यात आला.

दि. १२ ते १४ ऑक्टोबर दरम्यान अहमदाबाद येथे आयोजित कार्यक्रमात गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश व मुंबई येथील १६३ अभ्यासींनी सहभाग नोंदविला. ३० समन्वयक व त्यांना पाठबळ देणारे ३५ स्वयंसेवक यांच्या चमूने कार्यक्रमाचे संचालन केले. मिशनच्या वाङमयातील संबंधित साहित्य व गुरुदेवांची दृक-श्राव्य भाषणे यांच्या सहाय्यामुळे प्रशिक्षण प्रक्रिया नैसर्गिक व सहज ठरली. १५ वर्षांपेक्षा जास्त काळ साधना करत असलेल्या अभ्यासींना देखील असे जाणवले की या कार्यक्रमामुळे त्यांच्या सहजमार्ग साधनेच्या आकलनात आमूलाग्र बदल झाला आहे आणि खऱ्या अर्थाने सहजमार्ग अभ्यासी बनण्यासाठी काय केले पाहिजे, हे प्रत्येकालाच कार्यक्रमाच्या अखेरीस समजले होते.

दि. २४ ते २६ नोव्हेंबर दरम्यान जयपूर विभागीय आश्रमात एक तीन दिवसीय कार्यक्रम हिन्दी माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. राजस्थानातील ६ समन्वयकांसह ७० सहभागी अभ्यासी कार्यक्रमास उपस्थित होते. विविध सत्रांमध्ये व दृक-श्राव्य चित्रफीतीमध्ये प्रत्येक जण निमग्न झाले होते. त्यांना असे जाणवत होते की आपली हृदये खऱ्या अर्थाने उघडत आहेत. अभ्यासक्रम व विविध सत्रे ज्या पद्धतीने घेण्यात आली त्याची सहभागी अभ्यासींनी प्रशंसा केली. स्वयंसेवकांचे परिश्रम व प्रेम यामुळे विभागीय आश्रमात मूलभूत सुविधा पुरविता आल्या.

दि. १६ डिसेंबर रोजी उडुपी जवळील पेरमपल्ली आश्रमात 'रोजनिशी लेखन' या विषयावर एक पाठ्यक्रम घेण्यात आला. १३ अभ्यासी व २ समन्वयक त्यात सहभागी झाले होते. आध्यात्मिक उन्नतीचे तसेच चारित्र्य निर्मितीचे साधन म्हणून रोजनिशी लेखनाच्या विविध पैलूंचा उपयोग कसा करता येईल यावर चर्चा करण्यात आली. दृक-श्राव्य चित्रफीती तसेच रोजनिशी लेखनावरील गुरुदेवांच्या अवतरणांवर एक सादरीकरण प्रस्तुत करण्यात आले. हा कार्यक्रम कन्नड व इंग्रजी या भाषांमधून घेण्यात आला. 'ध्यान' या विषयावरील पुढील प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी जास्त अभ्यासींना प्रवृत्त करण्याचे अभिवचन सहभागी अभ्यासींनी दिले. कार्यक्रमावर सहभागींनी दिलेली प्रतिक्रिया भाराऊन टाकणारी होती.



# आश्रमांमध्ये आयोजित कार्यक्रम

रविवारचा पूर्ण दिवसाचा कार्यक्रम हा जुन्या व नवीन अभ्यासींना एकत्र आणण्याच्या हेतूने आयोजित केला जातो. समूह चर्चा व प्रश्नोत्तराच्या सत्राद्वारे अभ्यासींच्या साधनेविषयक शंकांचे निरसन केले जाते. हा कार्यक्रम अभ्यासींना आपली साधना नियमितपणे करण्यासाठी व आपल्या ध्येयाकडे अग्रेसर होण्यासाठी प्रेरित करतो. विविध केंद्रांद्वारे आयोजित पूर्ण दिवसीय व अर्ध दिवसीय कार्यक्रमांचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

दि. २ ऑक्टोबर रोजी तामिळनाडूमधील अविनाशी केंद्राद्वारे अर्ध दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता ज्यामध्ये सुमारे ५५ अभ्यासींनी भाग घेतला. या कार्यक्रमामध्ये अध्यात्मिकतेबद्दल जागरुकता निर्माण करणाऱ्या तसेच नविन अभ्यासींना सहजमार्ग समजावून सांगणाऱ्या भाषणांचा समावेश होता. यामध्ये मुलभूत सहजमार्ग साधनेचा समावेश होता. सहभागींना यावेळी शक्य तितके मौन पाळून आपला आंतरिक आवाज ऐकण्याचे आवाहन करण्यात आले.

दि. २३ ऑक्टोबर रोजी केरळमधील पयन्नूर केंद्रातील सहभागींनी 'व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राईटर वर्ल्ड' मधील उद्धरणांचे सादरीकरण केले. यावेळी उत्तर मलबार उप–विभागातील सात केंद्रांमधील सुमारे २०० अभ्यासी उपस्थित होते.

दि. ४ नोव्हेंबर रोजी राजस्थानमधील भिलवाडा केंद्राने 'गुरु' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारीत पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अनुभव कथनाचे सत्र तसेच एक नाटकदेखिल सादर करण्यात आले. 'सहजमार्ग टुवर्ड्स इन्फिनिटी' या पू. गुरुदेवांच्या डि.व्ही.डी. चे प्रसारण यावेळी करण्यात आले. उपस्थितांनी युवकांच्या चमूने केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

दि. १८ नोव्हेंबर रोजी केरळमधील अलूवा केंद्राने पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते ज्यामध्ये सुमारे २०० अभ्यासी सहभागी झाले होते. या कार्यक्रमामध्ये नियमित सत्संगांशिवाय पू. गुरुदेवांच्या भाषणांची ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली तसेच परस्पर संवादी सत्रासोबतच गायन व कवितांचे वाचन करण्यात आले. दिव्यत्व व ९ वा. ची प्रार्थना यासारख्या विषयांवरील शंकांचे निराकरणही यावेळी करण्यात आले.

दि. २ डिसेंबर रोजी आंध्रप्रदेशातील तिरुपती केंद्राने वेगळ्याप्रकारे पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये सुमारे १३० अभ्यासी सहभागी झाले होते. यावेळी अभ्यासींनी अनेक पर्याय असलेल्या प्रश्नावलीद्वारे स्वमूल्यमापन केले व निवड केलेल्या उत्तरांसाठीचे मूल्यांकन केले. हे प्रश्न सहजमार्ग, अभ्यासींचा इतरांशी असलेला व्यवहार, स्वयंसेवा व आश्रम या विषयांशी संबंधित होते. या कार्यक्रमाने सहभागींना स्वत:चा दृष्टीकोन समजण्यास व त्यामध्ये सुधारणा करण्यास मदत केली.

## दक्षिण तामिळनाडूमधील शिक्षकांना सहजमार्गाचे सादरीकरण (२०१२)

दि. २३ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधी दरम्यान मिशनचे संयुक्त सचिव ए. पी. दुराई यांनी दक्षिण तामिळनाडूमध्ये अनेक खुल्या सत्रांचे संचालन केले. सुरवातीच्या तीन दिवसांमध्ये तंजावूर, अरियालूर, तिरुवरुर व पूदूकोट्टई या केंद्रांचा समावेश होता. पुढील सहा दिवसांमध्ये तिरुनेलवेल्ली व कन्याकुमारी जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला.

या खुल्या चर्चासत्रांमध्ये शिक्षकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते व १७ शाळांमधील सुमारे ७५० शिक्षक यावेळी उपस्थित होते. यापैकी सुमारे २०० जणांनी सहजमार्ग साधना सुरु करण्याची तयारी दर्शविली. त्यांना साधना सुरु करण्याआधी स्वत:स तयार करण्यासाठी नवोदितांसाठी असलेले माहितीपत्रक देण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापकांना कार्यक्रमाआधी योग्य माहिती देण्यात आलेली नाही हे लक्षात आल्यावर त्यांना खुले सत्र आयोजित करण्याची परवानगी मागतेवेळीच एक पत्र व मिशनचे वाचन साहित्य देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जेव्हा बंधू दुराई यांनी पू. गुरुदेवांना सांगितले की काही दशकांपूर्वीच्या तुलनेत आता सहजमार्गाचा संदेश ऐकण्यासाठी लोक तयार दिसत आहेत तेव्हा गुरुदेव म्हणाले की "म्हणूनच बाबूजी महाराज सारखे म्हणत आहेत की लोकांच्या हृदयाची दारे उघडत आहेत."

या खुल्या सत्रांनी ती आयोजित करणाऱ्या प्रशिक्षक व अभ्यासींसाठी प्रशिक्षणासाठीचे व्यासपीठ म्हणूनही काम केले. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये प्रशिक्षक बंधू नल्लाईराम (वल्लीउर), अन्बालागन (तिरुनेलवेल्ली), डॉ. नाथन (नागरकोईल), कृष्णराजन (वदाकन्कुलम) आणि भगिनी डॉ. राजलक्ष्मी (तिरुनेलवेल्ली) यांना स्थानिक स्वयंसेवकांची साथ लाभली. तंजावूर व त्याजवळील केंद्रांमध्ये विभागप्रमुख बंधू मुरुगन यांनी स्थानिक प्रशिक्षक बंधू सुब्रमण्यम, बंधू पोयामोझी आणि भगिनी कामाक्षी यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन केले. पू. गुरुदेवांचे अस्तित्व या संपूर्ण उपक्रमादरम्यान जाणवत होते व यामुळेच जणूकाही सर्व संस्थांची दारे या कार्यक्रमांसाठी खुली झाली होती.



# आणंद आश्रम, गुजरात

## प्रकाशाचे केंद्र

"आपल्याला जे बनवायाचे आहे त्याचा आदर्श म्हणून गुरुदेवांचा उपयोग केला पाहिजे आणि सहज मार्ग आपल्याकरीता काय करीत आहे हे जाणण्यासाठी आपल्या अंतरंगात डोकावून पाहिले पाहिजे. त्यानंतर इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपण या मार्गावरुन धीरगंभीरपणे वाटचाल केली पाहिजे. मला ध्येयापर्यंत पोहोचायचे आहे; ध्येय माझ्यासमोर आहे. मला काय बनवायाचे आहे हे ते दर्शविते आहे. स्वत:कडे लक्ष देऊन मला काय तासून काढायचे आहे वा अधिक– उणे करायचे आहे हे माझ्या लक्षात येते. यामुळे प्रवास सोपा, अडथळ्यांविना आणि आटोपशीर असा होतो आणि ध्येयाप्रति पोहोचणे सहजसाध्य होते."

दि. २९ जानेवारी, २००४ रोजी पूज्य गुरुदेवांनी केलेल्या भाषणातील अंश







गुरुदेवांनी आणंद येथील आश्रमाला 'आनंदाश्रम' असे नाव दिले कारण येथे तुम्हाला सौख्याचा अनुभव येतो. वडोदरा व अहमदाबाद यांच्या मध्ये असणारे आणंद हे एक जिल्हा मुख्यालय आहे. अमूल डेअरी, आय.आर. एम. ए. तसेच एन.डी.डी.बी. या भारतामधील पूर्वगामी धवलक्रांती प्रणेत्यांकरता आणंद प्रसिद्ध आहे.

८०च्या दशकात व ९० च्या दशकाच्या सुरुवातीच्या वर्षांत गुरुदेवांनी वारंवार भेटी दिल्यामुळे तसेच गुरुदेवांच्या पत्नी सुलोचना मामी यांच्या काही महिन्यांच्या उपचाराच्या निमित्ताने घडलेल्या वास्तव्याने आणंद केंद्राची भरभराट झाली. आय.आर. एम. ए., एन.डी.डी.बी. व प्राणीवैद्यक महाविद्यालय या ठिकाणी गुरुदेवांची भाषणे झाली आहेत.

१९९५ मध्ये बंधू पी.एस. भार्गवा यांना गुरुदेवांनी त्यांच्या घरासाठीच्या भूखंडाच्या भागावर मिशनकरीता एका तात्पुरत्या शेडच्या स्वरूपात ध्यान–कक्ष बांधण्याची परवानगी दिली. गुरुदेवांनी 'मंडपम' असे त्याचे नामकरण केले. १९९६ मध्ये भगिनी अंजना नागर यांनी आणंदपासून ५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या हदगुड या गावातील जमिनीचा छोटा तुकडा आश्रम बांधण्यासाठी मिशनला समर्पित केला. १९९७ मध्ये गुरुदेवांनी आश्रम स्थळाला भेट दिली व जवळच्या अभ्यासी कॉलनीचे श्री राम चंद्र पुरम असे नामकरण केले. १५० व्यक्तींची क्षमता असणाऱ्या नव्या वास्तूचे उद्घाटन गुरुदेवांच्या परवानगीने दि. ५ सप्टेंबर २००० रोजी त्यावेळचे केंद्रप्रमुख बंधू मधुकर कोचर यांच्या हस्ते झाले. आणंद, वडोदरा वणकबोरी व नडियाद केंद्राचे सुमारे १६५ अभ्यासी या वेळी उपस्थित होते.





दि. ३० जानेवारी २००४ रोजी गुरुदेवांनी आणंदला भेट दिली. या वेळेपर्यंत बाहेरचा व्हरांडा व बगिचा यांची निर्मिती झाली होती तसेच आश्रमाच्या भूखंडावर पाण्याच्या स्त्रोताचाही शोध लागला होता. सत्संगानंतर गुरुदेवांनी आश्रमासमोर कदंब वृक्षाचे रोपटे लावले. आज सुमारे ४० फूट उंच अशा या वृक्षामुळे तसेच इतर झाडे व झुडूपांमुळे आश्रमाला अलौकिक असे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**
© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.